चेचक

विक्रमगडच्या शेतकऱ्याचा युरोप दौरा

विक्रमगड : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय कृषी अभ्यास दौऱ्यासाठी विक्रमगड तालुक्यातील प्रगतशील शेतकरी वैजनाथ पाटील यांची निवड झाली आहे. युरोपमधील प्रगत शेती तंत्रज्ञान आणि कृषी व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी पाटील सध्या या दौऱ्यात सहभागी झाले असून, यामुळे तालुक्याच्या कृषी क्षेत्रात आधुनिकतेचे वारे वाहण्याची चिन्हे आहेत. युरोपमध्ये सुरू असलेल्या या दौऱ्यात वैजनाथ पाटील यांना तेथील आधुनिक शेती पद्धती, प्रगत तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया उद्योग आणि फळबाग व्यवस्थापन यांचा प्रत्यक्ष अनुभव दिला जात आहे. युरोपीय देशांत कृषी व्यवस्थापन कशा पद्धतीने केले जाते आणि प्रगत मशिनरींचा वापर करून उत्पादकता कशी वाढवली जाते, याचे सखोल मार्गदर्शन त्यांना यावेळी मिळत आहे. या अभ्यास दौऱ्यामुळे मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग भविष्यात विक्रमगड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्थानिक शेती अधिक फायदेशीर कशी करता येईल, यासाठी पाटील यांचा हा अनुभव मोलाचा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निवडीसाठी आणि मार्गदर्शनासाठी विक्रमगडचे तालुका कृषी अधिकारी जगदीश दोंदे, मंडळ कृषी अधिकारी इंगळे आणि उपकृषी अधिकारी गोकुळ अहिरे यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले आहे. वैजनाथ पाटील यांच्या या यशाबद्दल त्यांचे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

देहेरेत 'ज्ञानज्योती वाचनालया'चा श्रीगणेशा

पालघर : दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी केवळ स्वप्ने पाहू नयेत, तर ती जिद्दीने पूर्ण करावीत, या उद्देशाने जव्हार तालुक्यातील देहेरे येथे 'ज्ञानज्योती सार्वजनिक वाचनालय व स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्रा'चा शुभारंभ करण्यात आला आहे. खावडा ट्रान्समिशन प्रोजेक्टच्या विशेष सहकार्यातून सुरू झालेला हा उपक्रम ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक दालन ठरणार आहे. विक्रमगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरिश्चंद्र सखाराम भोये यांच्या हस्ते या केंद्राचे दिमाखदार उद्घाटन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना त्यांनी ग्रामीण भागातील तरुणांना वाचनाची गोडी लागावी आणि स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून त्यांनी प्रशासकीय सेवेत भरारी घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. या वाचनालयाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ अवांतर वाचनाची पुस्तकेच नव्हे, तर इतर स्पर्धा परीक्षांसाठी लागणारे दुर्मिळ संदर्भग्रंथ, मार्गदर्शक पुस्तके आणि विविध वर्तमानपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. खावडा ट्रान्समिशन प्रोजेक्टच्या सामाजिक उत्तरदायित्वामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य आता त्यांच्या गावातच उपलब्ध झाले आहे. या प्रसंगी भाजप जिल्हा सरचिटणीस ज्योती हरिश्चंद्र भोये, देहेरे-देवगाव ग्रामपंचायतीचे सरपंच जितेश हरिश्चंद्र भोये, उपसरपंच सुमन दुर्गादास महाले आणि ग्रामसेवक अमित अशोकराव बोर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ओबीसी आरक्षणाचा लढा दिल्लीपर्यंत

विक्रमगड : महाराष्ट्र राज्यातील ३३ ओबीसी जाती समूहांचा केंद्रीय ओबीसी सूचीमध्ये समावेश व्हावा, या मागणीसाठी गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेला लढा आता निर्णायक वळणावर आला आहे. या लढ्याला अंतिम यश मिळवून देण्यासाठी आणि पुढील रणनीती ठरवण्यासाठी सकाळी १० वाजता खारघर येथील 'लेवे गुजर भवन' येथे एका विशेष राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ओबीसी कृती समितीचे अध्यक्ष श्रावण फरकाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या ३३ जातींच्या समावेशासाठी गेल्या अनेक दिवसांपासून समिती आक्रमकपणे पाठपुरावा करत आहे. यासाठी आतापर्यंत राज्य मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री, विविध खासदार आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदने देण्यात आली आहेत. राज्याच्या या ३३ जाती केंद्राच्या सवलतींपासून वंचित राहू नयेत, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत विक्रमगडमधील ओंदे महाविद्यालयास चार पुरस्कार

◆ विक्रमगड (वार्ताहर) :

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'करिअर कट्टा' राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा २०२५-२६ मध्ये ओंदे येथील महाविद्यालयाने ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे.

पालघर जिल्ह्यातील ४८ महाविद्यालयांच्या अटीतटीच्या स्पर्धेत ओंदे महाविद्यालयाने तब्बल ४ महत्त्वाच्या पुरस्कारांवर आपले नाव कोरून जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले आहे.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती (राज्यमंत्री दर्जा) रवींद्र साठे यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला. ओंदे महाविद्यालयाच्या डॉ. विनोद संभाजी सोनवणे यांना त्यांच्या कुशल नेतृत्वासाठी सन्मानित करण्यात आले.

'उत्कृष्ट समन्वयक' म्हणून प्रा. संतोष शिवलाल धामोणे यांचा गौरव झाला. जिल्हास्तरीय उत्कृष्ट महाविद्यालयात ओंदे महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. या यशासाठी संजीवन ग्रामीण व वैद्यकीय सामाजिक सहायता प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंद पाटील, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे आणि विभागीय समन्वयक डॉ. दीपा वर्मा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विरारमध्ये दोन मजुरांचा मृत्यू

विरार : ट्रकमधून लाद्या उतरवत असताना झालेल्या दुर्घटनेत दोन मजुरांचा मृत्यू झाला. विरारच्या साईनाथ नगर येथे ही दुर्घटना घडली. विरार पूर्वेच्या साईनाथ नगर येथील बजरंग प्लाझा इमारतीत काम सुरू होते. यासाठी फरशीच्या लाद्या घेऊन ट्रक आला होता. या ट्रकमधून लाद्या उतरवत असताना लाद्या खाली पडल्या. त्यात राजेश मध्धूराम (३९) आणि ओमप्रकाश शंभुनाथ (४०) हे दोन मजूर दाबले गेले. त्यांना उपचारासाठी मुंबईच्या केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी बोळींज पोलीस ठाण्यात अपमृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसई-विरार महापालिकेचा अर्थसंकल्प सोमवारी

उत्पन्न वाढीसह कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे आव्हान

◆ विरार (प्रतिनिधी) :

गेल्या वर्षी प्रशासनाने तयार केलेल्या अर्थसंकल्पाप्रमाणे खर्च न करण्याची वेळ अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अवघ्या चार-पाच महिन्यातच प्रशासनावर आली. अपेक्षित उत्पन्न वाढ करू न शकल्याने सर्वच विभागातील खर्चात ३० टक्के कपात करण्याची नामुष्की महापालिका प्रशासनावर ओढवली. महापालिकेचा यावर्षीचा अर्थसंकल्प ९ मार्च रोजी सादर होणार असून, कंत्राटावरील कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांसोबतच पालिकेच्या उत्पन्नात वाढ करण्याचे मोठे आव्हान नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांसमोर आहे. विशेष म्हणजे परिवहन सभापती नसल्याने परिवहन विभागाचा अर्थसंकल्प ही स्थायी समिती सभापतीकडेच सादर केल्या जाणार आहे.

महापालिका क्षेत्रातील तीन प्राथमिक आरोग्य केंद्र आणि १२ उपकेंद्र पालघर जिल्हा परिषदेकडून महापालिकेला विनामूल्य हस्तांतरित करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. मात्र त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही. हीच परिस्थिती शाळांची सुद्धा आहे. वसई-विरार नंतर झालेल्या महापालिकांनी सर्वप्रथम शाळा महापालिकेकडे घेतल्या. येथे मात्र महापालिका होऊन १७ वर्ष होत असताना महापालिका क्षेत्रातील ११७ शाळा जिल्हा परिषदेकडेच आहेत. यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केले आहेत. भविष्यात शाळा आणि रुग्णालय पालिकेकडे येथीलही, मात्र शाळा महापालिकेकडे आल्यावर किमान १२१ कोटी रुपयांचा आर्थिक बोजा केवळ शिक्षण विभागाचा पालिकेवर पडणार आहे. आरोग्य विभागाच्या खर्चासाठी सुद्धा कोट्यावधी रुपयाची तरतूद पालिकेला करावी लागणार आहे. आधीच दिवाबत्ती सेवा, सार्वजनिक परिवहन सेवा, मलनिसारण सेवा आणि पाणीपुरवठा योजना चालविण्याकरिता सन २०२३- २४ मध्ये आलेली १०० कोटींची वित्तीय तूट मालमत्ता करातूनच भागविल्या गेली आहे. अशी आर्थिक परिस्थिती वसई-विरार महापालिकेची आहे.

विशेष म्हणजे प्रशासनाकडून गेल्या वर्षी ३ हजार ९२६ कोटींचे बजेट प्रशासनाच्या वतीने प्रशासक असलेल्या आयुक्तांना सादर करण्यात आले. मात्र कोणतीही करवाढ प्रशासन करू शकले नाही. परिणामी गेल्या वर्षी बजेटमध्ये ३० टक्के कपात करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत उत्पन्न वाढविण्याचे मोठे 'टार्गेट' पदाधिकाऱ्यांसमोर आहे. त्याचप्रमाणे पालिकेत शेकडो कर्मचारी कंत्राटावर आहेत.

परिवहन सेवेचा तोटा कोट्यवधींनी वाढला :

वसई-विरार शहरात १५४ बसच्या माध्यमातून विविध अशा ३७ मार्गावर परिवहन सेवा पुरविल्या जात आहे. ११२ बसच्या परिवहन सेवेसाठी कंत्राटदाराकडून महापालिकेला प्रतिवर्ष, प्रतिबस १५०१ रुपये प्रमाणे " रॉयल्टी" दिली जाते, तर महापालिकेच्या चार्जिंग सेंटरवरून चार्जिंग करून चालविल्या जाणाऱ्या ४० बससाठी प्रति बस प्रति महिना ८ हजार ३०० रुपये रॉयल्टी महापालिका कंत्राटदाराकडून वसूल करते. शहरातील कर्करोग पीडित नागरिक, जेष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी यांनी या बस मधून प्रवास केल्यास त्यांचे भाडे महानगरपालिका प्रशासन कंत्राटदाराला अदा करते. आता अशाच प्रकारे या परिवहन सेवेचा लाभ घेणाऱ्या सर्व महिलांच्या ५० टक्के प्रवासाच्या खर्चाचा भार १ जून २०२६ पासून महानगरपालिका स्वतः उचलत आहे. त्यासाठी किमान दररोज २ लाख रुपयाचा भार महापालिकेच्या तिजोरीवर पडत आहे.

पाणीपुरवठा वाढणार तसा तोटा वाढणार :

वसई-विरार महानगरपालिकेला स्वतःची पाणीपुरवठा योजना चालविण्यासह" एमएमआरडीए" पाणी देयकापोटी वर्षभरात १९० कोटी रुपये खर्च येतो. आणि पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून महानगरपालिकेला ६६ कोटी रुपये वार्षिक उत्पन्न असून त्यापैकी ५० कोटी रुपये दरवर्षी वसूल होतात. पाणीपुरवठा योजना "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर चालवण्याचे शासनाचे निर्देश असताना सुद्धा महापालिकेची पाणीपुरवठा योजने मागे दरवर्षी १४० कोटी रुपयांची महसुली तूट आहे. अमृत योजनेद्वारे आता शहराच्या कानाकोपऱ्यात पाणीपुरवठा केल्या जाणार आहे. मात्र कर वाढ न झाल्यास पाणीपुरवठा योजना चालवण्यासाठी भविष्यात तोटा देखील वाढणार आहे.

अनधिकृत फेरीवाल्यांवर पालिकेची कारवाई

◆ विरार (प्रतिनिधी) :

वसई-विरार रेल्वे स्टेशन लगत अनधिकृतपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांवर प्रभाग समिती मार्फत कारवाई करण्यात येऊन सदरचा परिसर मोकळा करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे विविध सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, रहदारीची ठिकाणी, पदपथ आदी ठिकाणी अनधिकृतपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांवर महापालिकेकडून दररोज कारवाई सुरू आहे.

प्रभाग समिती 'जी' वालीव अंतर्गत प्रभाग सहा.आयुक्त नीलेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण विभागामार्फत सातिवली खिंड ते वालीव फाटा, भोईदापाडा परिसर व मुख्य रस्त्यावर अनधिकृतपणे बसलेल्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येऊन अनधिकृतपणे उभारलेल्या स्टॉल, टपऱ्यांवर जेसीबीच्या मदतीने तोडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ४१ टपऱ्या, २३ पत्राशेड, २५ बांबू शेड निष्कासीत करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रभाग समिती 'बी' अंतर्गत प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील राधाकृष्ण हॉटेल ते कारगिलनगर परिसरातील व मुख्य रस्त्यावरील अनधिकृतपणे उभारलेले स्टॉल, टपऱ्यांवर जेसीबीच्या मदतीने तोडक कारवाई करण्यात आली.

यावेळी प्रभाग सहा.आयुक्त अलका खैरे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण विभागामार्फत अनधिकृत टपऱ्या व स्टॉल पूर्णपणे तोडण्यात आले व परिसर मोकळा करण्यात आला. या कारवाईत एकूण २३ टपऱ्या, ०९ बांबूशेड निष्कासीत करण्यात आले.

प्रभाग समिती 'ई' नालासोपारा अंतर्गत नालासोपारा पूर्वेकडील मुख्य रस्त्यावरील तसेच स्टेशन परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर प्रभाग सहा.आयुक्त विजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करण्यात येऊन परिसर मोकळा करण्यात आला. वरीलप्रमाणे अनधिकृत फेरीवाल्यांवरील कारवाई महापालिकेमार्फत सुरूच राहणार असून शहरातील नागरिकांना ये-जा करण्यास तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या फेरीवाल्यांविरुद्ध महापालिकेमार्फत नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे सर्व फेरीवाल्यांनी सार्वजनिक रस्ते, ठिकाणे, पदपथांवर अडथळा निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. असे आवाहन आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

संबळाच्या तालावर अवतरले पौराणिक देव-देवता!

◆ मोखाडा (वार्ताहर) :

मोखाडा तालुक्यात होळीनंतरचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. धुलीवंदनापासून सुरू होणारा शेकडो वर्षांची परंपरा लाभलेला 'जगदंबा उत्सव' (बोहाडा) थाटात सुरू झाला असून, संपूर्ण तालुका भक्ती आणि आदिवासी संस्कृतीच्या रंगात न्हाऊन निघाला आहे. आदिवासी नागरी संस्कृतीचे प्रतीक मानला जाणारा हा बोहाडा उत्सव सुमारे २५० वर्षांहून अधिक जुना आहे. विशेष म्हणजे, या उत्सवात वापरले जाणारे काही मुखवटे २०० वर्षांपूर्वीचे असून ते आजही जतन करून वापरले जात आहेत. उंबर आणि सागाच्या लाकडापासून अत्यंत कुशलतेने कोरलेले हे मुखवटे आधुनिक रंगांनी सजवून अधिक आकर्षक करण्यात आले आहेत.

धूलिवंदनापासून सलग आठ दिवस चालणाऱ्या या उत्सवात क एकत्र येतात. संबळाच्या विशिष्ट तालावर आणि रात्रीच्या वेळी टेंभ्याच्या (मशालींच्या) प्रकाशात पौराणिक पात्रांची सोंगे नाचवली जातात.

सर्वधर्मसमभावाचे दर्शन!

बोहाडा उत्सव हा केवळ आदिवासींचा सण न राहता तो एक लोकउत्सव बनला आहे. वर्षभराचे कष्ट विसरून आदिवासी बांधव यात तल्लीन होतात. विशेषतः महिला पारंपरिक वेशभूषा, दागिने आणि फुलांच्या गजऱ्यांनी नटून-थटून मोठ्या संख्येने सहभागी होतात. या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे हिंदू-मुस्लिम बांधव, सासुरवाशिणी आणि नोकरीनिमित्त बाहेर गेलेले चाकरमानी आवर्जून हजेरी लावतात. महाराष्ट्र आणि गुजरातच्या कानाकोपऱ्यातून येणारे अभ्यासक आणि रसिक या आदिवासी कला-संस्कृतीचा वारसा जवळून अनुभवतात.

महावितरण

ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-११४, टी- ११५, टी-११६, टी-११७, टी-११८, टी-११९, टी- १२०, टी-१२१, टी-१२२, टी-१२३ आणि टी-१२४ (२०२५-२६) अशा एकुण **अकरा** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ०७.०३.२०२६ पासून ते दि. १५.०३.२०२६** पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १६.०३.२०२६** ला **दुपारी १.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल. **(सही)**

कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप

(प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदाकरिता वृत्तपत्र जाहिरात नमुना)

जाहिरात: "प्रभागसंघ व्यवस्थापक पद भरती" उमेद' - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान' जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष पालघर, जि. पालघर.

'उमेद'-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) या पदाकरिता पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील ३१ (एकतीस) आदर्श प्रभागसंघाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रति आदर्श प्रभागसंघ १ प्रभागसंघ व्यवस्थापक पद भरण्यात येईल. या पद भरतीबाबत तालुका व प्रभागसंघ निहाय सविस्तर विवरण पुढीलप्रमाणे:

अ.क्र.	तालुक्याचे नाव	संख्या
१	पालघर	१७
२	जव्हार	३
३	तलासरी	२
४	वसई	२
५	विक्रमगड	२
६	वाडा	२
७	डहाणु	२
८	मोखाडा	१

* सदर पद हे प्रभागसंघस्तरीय (समुदायस्तरीय संस्था) असून ११ महिन्याच्या करार तत्वावर भरणेत येणार आहे. प्रभागसंघ व्यवस्थापक यांस प्रती महिना मानधन व प्रवास भत्ता असे एकुण ७,५००/-रु. अनुज्ञेय राहील.

अर्ज करणारा उमेदवार हा स्वयंसहाय्यता समुहातील असावा. संबंधित तालुक्यातील अर्जदार कोणत्याही प्रभागातून चलेल. या बाबतची अधिक माहिती संबंधित तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष येथे उपलब्ध आहे. सदरचे सूचनापत्र हे अंतिम असून अर्जाची अंतिम तारीख १२.०३.२०२६ असून नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी https://www.zppalghar.gov.in/ वर भेट द्यावी

जिल्हा अभियान सहसंचालक तथा
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा पालघर.

शिक्का

UJJIVAN

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

नोंदणीकृत कार्यालय: ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालय: ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव **"जसे आहे जेथे आहे"** आणि **"जसे आहे तसे आहे तत्वावर"** खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव	१३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार	ताब्याचा दिनांक	राखीव मूल्य आएनआर मध्ये/ इरठे आएनआर मध्ये
1	४४१२२३०११ ०००००१/ ४४१२-ठाणे	१) दिशा एन्टरप्रायझेस, त्यांचे प्रोप्रायटर रोहिदास हरिश्चंद्र इताडकर ह्यांच्या द्वारे, २) रोहिदास हरिश्चंद्र इतादकर, ३) प्रतीक्षा रोहिदास इतादकर, डी १०३, १ ला मजला, बिल्डींग डी, उमिया कंपाउंड, शिल्पा हॉटेल जवळ, काल्हेर, भिवंडी, ठाणे ४२१३०२. १) येथे देखीलः एच. क्र. १२९९/बी/१०, गाळा क्र. ११०, १ ला मजला, श्री. राजलक्ष्मी कॉम्प्लेक्स, बिल्डींग सी, काल्हेर ठाणे – ४२१३०२. २) आणि ३) येथे देखीलः खोली क्र. १०, कृष्ण कुंज बिल्डींग, पूर्णा येथे वसलेल्या गाव भिवंडी, पूर्णा, ठाणे ४२१३०२ येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला घर क्र. २९९	०८.१०.२०२४/ ३०.०९.२०२४ अनुसार रु. ४१,०२,३३४.९/-	०४.१२.२०२५	रु. ४२,००,०००/- रु. ४,२०,०००/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव पूर्णा, ता. भिवंडी, आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. १०६, हिस्सा क्र. ५ वर बांधण्यात आलेल्या "स्वामी छाया बिल्डींग" म्हणून ज्ञात इमारतीच्या तळ मजल्यावरील ७०० चौ. फू. (बिल्टअप) क्षेत्रफळाचे दुकान ०१, ग्रामपंचायत घर क्र. २४०/ एफ असलेली सर्व मालमत्ता. जमिनीच्या सीमा पुढीलप्रमाणे (तांत्रिक अहवालानुसार): पूर्वः रोड, पश्चिमः गोडाऊन, दक्षिण : रोड, उत्तरः अंकित हाऊस. रोहिदास हरिश्चंद्र इतादकर ह्यांच्या मालकीचे			
2	४४११२१०१३ ०००००४४/ ४४११-कोपरखैरणे	१) चंदनकुमार झुरी विश्वकर्मा, २) अनिता देवी दोघांचा पत्ताः सदनिका क्र. १११, १ ला मजला, बी विंग, नवजन कल्याण रेसिडन्सी, अदिवली-ढोकाळी, कल्याण पूर्व, हाजीमलंग रोड, महाराष्ट्र ४२१३०६ आणि १) येथे देखील : काव्या एंटरप्रायझेस, दुकान क्र. १ कोकण वैभव चाळ, कोमिट कामराज नगर, विन मार्ग, घाटकोपर पूर्व, महाराष्ट्र- ४०००७७. अनु. क्र.१ येथे देखील : सुखसागर चाळ क्र. ४/४२, कामराज नगर ई. ई. एक्स्प्रेस हायवे रोड, राजावाडी, घाटकोपर पूर्व, मुंबई, महाराष्ट्र ४०००७७	१४.०१.२०२५/ ०३.०१.२०२५ अनुसार रु. ९,१५,०३४.८/-	०९.१२.२०२५	रु. ७,५४,०००/- रु. ७५,४००/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : ग्रामपंचायत आदिवली ढोकाळीच्या हद्दीमधील गाव आदिवली ढोकाळी, तालुका – अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जुना सर्वे क्र. ४५, हिस्सा क्र. ९ जी, आणि सर्वे क्र. ४५, हिस्सा क्र. १२ ए, सर्वे क्र. ४५, हिस्सा क्र. ९/६ वर बांधण्यात आलेल्या "नव जनकल्याण रेसिडन्सी" म्हणून ज्ञात इमारतीच्या विंग बी च्या १ ल्या मजल्यावरील ३४० चौ. फू. (बिल्ट अप क्षेत्र) जे ३१.५९ चौ. मी. शी समतुल्य असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. १११ चा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः सर्वे क्र. ४५/९ जी, पश्चिम : सर्वे क्र. ४५/१२ बी, दक्षिणः हरीओम कंस्ट्रक्शन, उत्तर : सर्वे क्र. ४५/९ जी. अनिता देवी विश्वकर्मा आणि चंदनकुमार झुरी विश्वकर्मा ह्यांच्या मालकीचे.			
3	४५०५२१०१०१३ ०००००९९ / ४५०५-विरार	१) सैफ नसीम खान, २) शमीम नसीम खान, ३) आमीर नसीम खान, सर्व येथे राहणारः सदनिका क्र. ४०१-४०२, वेनचुरा रेसिडन्सी, सीएमजी पळेकर रोड, वसई रोड, ठाणे, महाराष्ट्र ४०१२०१ सर्व येथे देखीलः इमारत क्र. ४८, खोली क्र. ५४, अनार्या कॉ-ऑप हौ.सोसायटी, जस्मिन मिल रोड, राजश्री, शाहूनगर म्युन्सिपल स्कूल, माटुंगा, मुंबई महाराष्ट्र ४०००१९. अनु. क्र. १ येथे देखीलः सुपर चिकन, दुकान क्र. ०१८०२, तुंगारेश्वर फाटा, बापा सीताराम मंदिर, इमा. क्र. ०३, वसई गाव, भास्कर आळी, वसई रोड, ठाणे, महाराष्ट्र ४०१२०१.	१४.०९.२०२३/ १९.०८.२०२३ अनुसार रु. ११,७१,५५८.००/-	३०.१२.२०२५	रु. १३,३२,०००/- रु. १,३३,२००/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : सदनिका क्र. ००४, तळ मजला, मोजमाप ४८० चौ. फू. बिल्टअप म्हणजेच ४४.६० चौ. मी. "सिसिलिया हाईटस" सर्वे क्र. १०, मिळकत क्र. ३०६९ शिव मंदिर जवळ, गाव गोखीवरे, गोलाणी नाका, वसई पूर्व, जिल्हा पालघर, महाराष्ट्र.			

मालमत्ता (मत्ता) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ	::	१२.०३.२०२६ आणि २३.०३.२०२६ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान
बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक	::	२५.०३.२०२६ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान
लिलावाचा दिनांक आणि वेळ	::	२७.०३.२०२६ रोजी स. ११:०० वा ते दु. २:०० वा. दरम्यान
इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत),		

बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१.

संपर्क तपशीलः कृष्णा सिंगः ७७६७८४७५८४, भक्ती नेना : ९२२४४७१४९४).

अटी आणि शर्ती : ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.

१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमत्ता ही सध्याच्या आणि भविष्यातील धारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.

२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.

३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.

४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९). इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com